

दैनिक


# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | गुरुवार, 5 मार्च 2026 | अंक क्र. 284 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com








## विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत यांच्या तर्फे

# रामेश्वर येथे राष्ट्रधर्मपूजक - दादाराव कराड स्मृती; महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धेचे आयोजन

■ लातूर प्रतिनिधी





विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने राष्ट्रधर्मपूजक-दादाराव कराड स्मृती प्रित्यर्थ लातूर येथील विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रुई) येथे राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा-२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा मंगळवार, दि. १० मार्च २०२६ रोजी होणार आहे. स्पर्धेतील सर्वश्रेष्ठ विजेत्या मल्लास रोख रूपये १,२५,०००/- चांदीची गदा, मेडल व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी कुस्ती खेळाडूसह क्रीडा प्रेमींनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आ. रमेशअप्पा कराड यांनी केले आहे.

माईर्स एमआयटी शिक्षण समूहाचे कार्यकारी अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. राहुल वि. कराड यांच्या मार्गदर्शनात ही स्पर्धा संपन्न होणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन मंगळवार, दि. १० मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे. तसेच, पारितोषिक वितरण समारंभ याच दिवशी सायं. ७ वा. होणार आहे. समारंभास ट्रिपल महाराष्ट्र केसरी आणि अर्जुन अवॉर्डी पै. नरसिंग यादव प्रमुख पाहुणे तसेच, हिंद केसरी पै. जगदीश कालीरमण हे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग, महाराष्ट्र केसरी पै. आप्पासाहेब कदम, महाराष्ट्र केसरी आणि महाराष्ट्र श्री पै. विजय उर्फ विकी बनकर हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. रामेश्वर (रुई) चे माजी सरपंच तुळशीराम दा. कराड हे प्रमुख मार्गदर्शक आहेत. विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या अध्यक्षतेखाली ही स्पर्धा होणार आहे.

राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे हे १९ वे वर्ष आहे. यासाठी महाराष्ट्रातील नामवंतासह देशभरातील मल्लांना निमंत्रीत केले आहे. राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेतील महावीर केसरी गटातील सर्वश्रेष्ठ विजेत्या मल्लास महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी हा अत्यंत बहुमानाचा किताब, रोख रूपये १,२५,०००/- चांदीची गदा व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. द्वितीय क्रमांकास रोख रूपये १,००,०००/-, तृतीय क्रमांक ५० हजार आणि चतुर्थ क्रमांकास २५ हजार रूपये यासह वजन गट ५७, ६१, ६५, ७०, ७४, ८६ आणि ८६ प्लस ते १२५ किलो वजन गटातील विजेत्या मल्लांना गटनिहाय हजारो रूपयांची पारितोषिके, सुवर्ण, रौप्य, कास्यं पदक, मेडल, प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच, उपांत्यपूर्व फेरीमध्ये पोहोचलेल्या सर्व कुस्तीगीरांना मानधन देण्यात येईल. थोर स्वातंत्र्य सेनानी, राष्ट्रीय कीर्तनकार, आरोग्य शास्त्रातील एक महान चमत्कार, योग महर्षि शतायुषी वै. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलारमामा यांच्या स्मृतिप्रित्यर्थ तंदुरूस्त अशा पंच्चाहत्तर वर्षे वयाच्या पुढील मल्लांसाठी याच दिवशी एक आगळी वेगळी कुस्तीस्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. विजेत्यांना योग महर्षी वै. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलारमामा स्मृती सुवर्ण, रौप्य, कांस्य गौरव पदक बहाल करण्यात येईल. सर्व मल्लांची वजने सोमवार दि. ९ मार्च २०२६ रोजी सायं. ४ ते ८ पर्यंत घेतली जातील. सर्व कुस्तीगीरांनी आधारकार्डची मूळ प्रत व त्याची झेरॉक्स प्रत आणणे बंधनकारक आहे. स्पर्धा राज्य संघटनेच्या नियमानुसार घेण्यात येणार आहे. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी कोणतीही प्रवेश फी आकारली जाणार नाही. स्पर्धेसाठी येणाऱ्या सर्व कुस्तीगीरांच्या जाण्या-येण्याचे एस.टी.भाडे, निवासाची व भोजनाची व्यवस्था संयोजकांतर्फे करण्यात येईल. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रा. विलास कथुरे (मो.नं.९८५०२११४०४), पै. राहुल बिराजदार (मो. नं.८००७५९३४३४), यांच्याशी संपर्क साधावा. या स्पर्धेत जास्तीत जास्त मल्लांनी सहभागी व्हावे. त्याच बरोबर या कुस्ती स्पर्धेसाठी क्रीडाप्रेमींनी हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा संयोजन समितीचे सचिव प्रा. विलास कथुरे, एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस, डॉ. महेश थोरवे आणि क्रीडा विभागाचे संचालक डॉ. वैभव वाघ यांच्यासह संयोजन समितीने केले आहे.

# आष्टीत रंगली 'विकासा'ची धुलवड ; पाण्यासाठी दोन माजी आमदार एकवटले आष्टी, पाटोदा,शिरूरच्या पाणी प्रश्नावर मंथन

## व्यापक जनआंदोलन उभारण्याचा नेत्यांचा इशारा

■ आष्टी (प्रतिनिधी)

रंगांचा सण असलेल्या धुलीवंदनाच्या दिवशी आष्टी तालुक्यात मात्र एका वेगळ्याच 'विकासाच्या धुलवडी'चा रंग पाहायला मिळाला. मतदार संघातील शाश्वत विकासाचा आणि प्रामुख्याने 'पाणी' या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी माजी आ.भीमराव धोंडे आणि माजी आ.बाळासाहेब आजबे या दोन नेत्यांनी एकत्र येत रणशिंग फुंकले आहे.या महत्त्वपूर्ण बैठकीने मतदार संघातील राजकीय समीकरणे बदलण्याची नांदी दिली असून,तिन्ही तालुक्यांतील कार्यकर्त्यांनी याला उत्स्फूर्त पाठिंबा दर्शवला आहे. आष्टी येथील भगवान महाविद्यालयात मंगळवारी दि.३ मार्च रोजी ही विशेष बैठक पार पडली.

यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दिपक घुमरे (पाटोदा), आष्टी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे, माजी जि.प.सदस्य रामराव खेडकर, आप्पासाहेब राख, पाटोदा कृ.उ. बा. समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे,हनुमंत थोरवे,आरपी आयचे आष्टी तालुकाध्यक्ष अशोक साळवे, माजी सभापती नियामत बेग,माजी सभापती अनिल जायभाये,सतीश मामा झगडे,सरपंच दादा जगताप, माऊली वाघ,सुदाम काका झिंजूरके, हरिभाऊ जंजिरे, संजय विधाते, अंकुश मुंडे,संभाजी जगताप,बजरंग कर्डिले,नानाभाऊ वाडेकर,संजय चंदनशिव,सोपान गाडे,आबासाहेब तावरे,आदिनाथ गवळी,भागवत वारे,बबन सांगळे, बाळासाहेब शेकडे,विकास वनवे,गणेश सांगळे, आदेश निमोनकर, सचिन नालकोल, निलेश सोनवणे, सय्यद शहाबुद्दीन,, चंद्रशेखर साके, संजय नालकोल, महारुद्र खेडकर, धोंडीबा सांगळे, सूर्यभान सांगळे, दीपक बोराडे आदी मान्यवर व पाटोदा, शिरूर तालुक्यातील शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या दुष्काळी पट्ट्यातील शेतकऱ्यांचा वनवास कायमचा संपवण्यासाठी पाणी कसे उपलब्ध होईल,यावर दोन्ही नेत्यांनी सविस्तर आणि अभ्यासपूर्ण मंथन केले.



### शेतकऱ्यांच्या शाश्वत पाणी योजनेवर व्यापक चर्चा!

आष्टी,पाटोदा, शिरूर हे तालुके सिंचनाच्या बाबतीत अत्यंत मागे आहेत. भविष्यातील यांत्रिकीकरणा मुळे (हार्वेस्टर) ऊसतोड कामगारांसमोर रोजगाराचे मोठे संकट उभे राहू शकते.या पार्श्वभूमीवर, विविध मार्गांनी या दुष्काळी पट्ट्यात पाणी आणणे क्रमप्राप्त आहे. यासाठी लवकरच मंत्रिमंडळाशी चर्चा करून जनहिताच्या या विकास योजनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी शेवटपर्यंत लढा देण्याचा निर्धार माजी आ. भीमराव धोंडे आणि बाळासाहेब आजबे यांनी या बैठकीत व्यक्त केला.

### हार्वेस्टरमुळे बेकारी वाढेल,सिंचन हाच पर्याय : माजी आ. भीमराव धोंडे

यावेळी बोलताना माजी आ.भीमराव धोंडे यांनी भविष्यातील संकटावर बोट ठेवले. ते म्हणाले, बीड हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा आहे.भविष्यात ऊसतोडीसाठी हार्वेस्टरचा वापर वाढल्यास या मजुरांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळेल. मुळातच पर्जन्यमान कमी असल्याने आपले तालुके दुष्काळी म्हणून गणले जातात. त्यामुळे येथे सिंचनाच्या सुविधा निर्माण करून पाणी आणणे ही काळाची गरज आहे.यासाठी सर्व मंत्र्यांची भेट घेणार असल्याचे सांगतानाच, न भूतो न भविष्यती अशी लोकचळवळ उभारू आणि जनसामान्यांच्या रेट्यामुळे आपला हा विषय अंतिम टप्प्यात यशस्वी करू असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देतील, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

### सत्तेत असलो तरी प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरू : माजी आ. बाळासाहेब आजबे

माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी या प्रश्नावर तांत्रिक आणि अभ्यासपूर्ण मांडणी केली.जायकवाडी धरणातून काही भागाला पाणी मिळणे,खुंटेफळ प्रकल्पाचे ४ टीएमसी पाणी आणि सीना प्रकल्पाच्या आवर्तनातून पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे असे माजी आ. आजबे म्हणाले. प्रशासकीय पातळीवर योग्य पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत.सत्तेत असलो तरी जनहिताच्या आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची आपली पूर्ण तयारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.राजकीय समीकरणे बदलणार ? एरवी राजकीय आखाड्यात वेगळ्या भूमिका घेणारे हे दोन बडे नेते मतदारसंघाच्या हितासाठी एकत्र आल्याने कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.या एकाधिकारशाही मोडून काढणाऱ्या ऐतिहासिक निर्णयामुळे भविष्यातील राजकीय आणि सामाजिक समीकरणे बदलतील असा अंदाज राजकीय विश्लेषकांकडून वर्तवला जात आहे. बैठकीच्या शेवटी दोन्ही नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी एकमेकांना रंग लावून खऱ्या अर्थाने विकासाचे धुलीवंदन साजरे केले.

# परळी तालुक्याची 'कृषी स्पंदन' महोत्सवात दमदार कामगिरी

## विविध स्पर्धांमध्ये लक्षणीय सहभाग आणि विविध स्पर्धांत मिळविला विजय

■ परळी | प्रतिनिधी

बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या कृषी विभागाच्या दोन दिवसीय 'कृषी स्पंदन' महोत्सवात परळी तालुक्याने उत्स्फूर्त सहभाग नोंदवत उल्लेखनीय कामगिरी केली. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धांमध्ये सहभाग घेत अनेक स्पर्धांमध्ये विजय संपादन करून तालुक्याचे नाव उज्ज्वल केले.

जिल्हा कृषी कार्यालयाच्या वतीने आयोजित या महोत्सवात विविध क्रीडा प्रकारांसह सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. परळी तालुक्यातील कृषी अधिकारी, मंडळ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी क्रिकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी, दोरीखेच, बॅडमिंटन, कॅरम, बुद्धिबळ तसेच १००, २०० आणि ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला.



दैनंदिन कामाच्या व्यापातून थोडी विश्रांती मिळावी आणि परस्परांतील सुसंवाद वाढावा या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवात परळी तालुक्याने संघभावना, शिस्त आणि उत्कृष्ट क्रीडास्पर्धा कौशल्य यांचे दर्शन घडवले. सांस्कृतिक विभागातही परळी तालुक्याच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी गायन, समूह सादरीकरण व पारंपरिक वेशभूषा सादरीकरणातून प्रेक्षकांची मने जिंकली. तालुक्यातील महिला कर्मचाऱ्यांचा सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. दररोजच्या प्रशासकीय कामातून वेळ काढून परळी तालुक्याच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या सरावाचे फळ या महोत्सवात दिसून आले. तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली संघभावना व शिस्तबद्ध नियोजनामुळेच हा महोत्सवात यशस्वी सहभाग शक्य झाल्याची भावना सहभागी कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. या यशाबद्दल मा. तालुका कृषि अधिकारी डॉ. अर्चना नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सहभागी अधिकारी-कर्मचाऱ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून, भविष्यातही अशीच दमदार कामगिरी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.




## संपादकीय

# राष्ट्र, संस्कार आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी श्री गुरु तेग बहादुर यांची अमर शहादत

''जिन्हूं न निंदा दुखी करदी है, न उसतत खुश करदी है: जो मान-अपमान नूं बराबर समझदा है...''

या गुरुबाणीतील ओळींमधून नववे गुरू श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांनी स्थिरचत्ति, निर्भय आणि निस्पृह जीवनाचा आदर्श समाजासमोर ठेवला. निंदा-स्तुती, हर्ष-शोक, मान-अपमान यापलीकडे जाऊन सत्यासाठी उभे राहण्याची शिकवण त्यांनी केवळ शब्दांनी नाही, तर आपल्या जीवनातून आणि शहिदीतून दिली. त्यागमल ते मतेग बहादुरफ - शौर्य आणि अध्यात्माचा संगम : सहावे गुरू श्री गुरू हरगोबिंद जी यांच्या पुत्राचे बालनाव 'त्यागमल' होते. करतारपूरच्या युद्धात त्यांनी दाखवलेल्या अद्वितीय पराक्रमामुळे त्यांना 'तेग बहादुर' म्हणजेच 'शूर तलवारबाज' हे नाव प्राप्त झाले. शौर्य आणि त्याग यांचा अद्वितीय संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसतो. आठवे गुरू श्री गुरू हरकृष्ण जी यांच्या निधनानंतर १६६५ मध्ये ते गुरू गादीवर विराजमान झाले. पंजाबमधील बाबा बकाला येथे त्यांनी नववे गुरू म्हणून जबाबदारी स्वीकारली आणि शीख पंथाला नवे आध्यात्मिक नेतृत्व दिले. एक ओंकार ते सर्वधर्म समभाव: पहिले गुरू श्री गुरू नानक देव जी यांनी दिलेला 'एक ओंकार'चा संदेश केवळ धार्मिक नव्हता, तर सामाजिक समतेचा ध्वज होता. जात-पात, उच्च-नीच, भेदभाव यांच्या पलीकडे जाऊन मानवतेचा विचार त्यांनी दिला. लंगर परंपरेतून समानतेचा प्रत्यक्ष अनुभव दिला. हीच परंपरा पुढे नेत श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांनी धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांचे रक्षण आपले ध्येय मानले.

अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा :

मुघलकालीन दडपशाहीच्या पार्श्वभूमीवर जेव्हा निरपराध नागरिकांवर अन्याय होत होता, तेव्हा जनतेने श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांना साद घातली. त्यांनी दिल्लीकडे प्रस्थान केले आणि धर्मस्वातंत्र्यासाठी निर्भयपणे उभे राहिले. त्यांचे सहकारी भाई मतीदास, भाई सतीदास आणि भाई दयाला यांना अमानुष छळ सहन



करावा लागला. पण गुरुजी डगमगले नाहीत. ११ नोव्हेंबर १६७५ रोजी दिल्लीतील चांदणी चौक येथे, आज जिथे गुरुद्वारा शीश गंज साहिब उभा आहे, त्या ठिकाणी त्यांनी शिर अर्पण केले. त्यांनी धर्मांतर किंवा चमत्कार दाखवण्यास नकार देत शहादत स्वीकारली. त्यांच्या या सर्वोच्च त्यागामुळे त्यांना 'हिंद दी चादर' ही पदवी लाभली म्हणजेच हिंदुस्थानच्या धर्म-संस्कृतीचे रक्षण करणारी ढाल. अंतिम संस्कार आणि अमर स्मृती : शहादतीनंतर त्यांच्या पार्थिवाचे अंतिम संस्कार करण्यास बंदी होती; परंतु लखी शाह बंजारा यांनी आपल्या घराला अग्नी देऊन गुरुजींचे अंत्यसंस्कार केले. त्या स्थळी आज गुरुद्वारा रकाब गंज साहिब उभारण्यात आला आहे. त्यांचे शिर भाई जैताजी यांनी आनंदपूर साहिब येथे नेऊन दहावे गुरू श्री गुरू गोविंद सिंह यांच्याकडे सुपूर्द केले. त्या ठिकाणी आज आनंदपूर साहिब हे पवित्र स्थळ आहे. श्री गुरू गोविंद सिंह यांनी त्यांच्या दोह्यात लिहिले: ''शीख दिया पर सिरर न दिया, धर्म हेतु साका जिन किया।'' बलिदानाचा खरा अर्थ : श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांचे बलिदान कोणत्याही व्यक्ती विरोधात नव्हते; ते असहिष्णुतेच्या विचारसरणीविरुद्ध होते. त्यांनी केवळ आपले शिर दिले नाही, तर जगण्याचा मार्ग दिला अन्यायासमोर न झुकण्याचा, सत्यासाठी उभे राहण्याचा आणि मानवतेची सेवा करण्याचा. भारतीय संस्कृती 'वसुधैव कुटुंबकम्', सर्वधर्म समभाव आणि सहजीवनाचा संदेश देते. हजारो मतमतांतरे असूनही एकत्र राहण्याची क्षमता हीच भारतीयत्वाची खरी ओळख आहे.

आजच्या पिढीसाठी संदेश

भारत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र होण्याचे स्वप्न पाहत आहे; परंतु विकास केवळ आर्थिक नसतो; तो मूल्याधिष्ठित असतो. सत्य, साहस, त्याग, कर्तव्य आणि समभाव हीच गुरू परंपरेची देणगी आहे. आजच्या युवकांसाठी श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांची शहादत ही केवळ इतिहासातील घटना नाही; ती जीवनाची दिशा आहे. संत भगत नामदेवांचा संदेश संत भगत नामदेव म्हणतात: ''ऐसा गुरू वडभागी पाइआ, जिनि हउमै मारि सबदि मिलाइआ।'' अहंकार नष्ट करून परमसत्याशी एकरूप करणारा गुरू भाग्यानेच लाभतो. श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांचे जीवन हे त्याचे जिवंत उदाहरण आहे. राष्ट्र, संस्कार आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेले श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांचे बलिदान हे भारतीय इतिहासातील सुवर्णपान आहे. त्यांच्या शहादतीतून आपण असा भारत घडवण्याची प्रतिज्ञा करू या जिथे सहिष्णुता, न्याय, मानवाधिकार आणि वैश्विक शांतता सर्वोच्च असतील. हीच त्यांना खरी आदरांजली.

ऐतिहासिक नाते :

हिंद-दी-चादर कार्यक्रमांच्या माध्यमातून श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या बलिदानाचे स्मरण राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विभागामार्फत आयोजित कार्यक्रमांच्या माध्यमातून करण्यात येत आहे. स्वातंत्र्याची जपणूक, श्रद्धेचे स्वातंत्र्य, मानवतेचे रक्षण व मानवी प्रतिष्ठेसाठी दिलेल्या त्यांच्या सर्वोच्च शहिदीचे हे कालातीत प्रतीक आहे.

हा ऐतिहासिक स्मरणोत्सव बहुदिवसीय, व्यापक स्वरूपातील सार्वजनिक कार्यक्रम म्हणून आयोजित करण्यात येत असून, त्यामध्ये आध्यात्मिक साधना, ऐतिहासिक जागृती, युवकांचा सहभाग तसेच सामाजिक एकात्मता यांचा समन्वय साधण्यात येत आहे. प्रथमच या उपक्रमांच्या माध्यमातून शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी तसेच भगत नामदेव संप्रदाय अशा श्री गुरू तेग बहादूर साहिब जी यांच्याशी ऐतिहासिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक नाते असलेल्या समुदायांना एका व्यासपीठावर आणण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहे. ३५० वर्षांनंतर या ऐतिहासिक नात्याचे पुनरुज्जीवन व बळकटीकरण करण्याचा राज्य शासनाचा हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. या कार्यक्रमांमध्ये आध्यात्मिक प्रवचने, कीर्तन, ऐतिहासिक प्रदर्शन, शैक्षणिक सादरीकरणे तसेच समुदाय संवाद यांचा समावेश असून, श्री गुरू तेग बहादूर साहिब जी यांचे जीवन, कार्य, शिकवण व त्याग यांचे सखोल दर्शन घडविले जात आहे. गुरुजींच्या शहिदीचे ऐतिहासिक महत्त्व व संविधानिक मूल्ये-धर्मस्वातंत्र्य, समानता व न्याय-यांच्याशी असलेले त्यांचे नाते नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश आहे.

या कार्यक्रमातून गुरुजींच्या काळात बंजारा व लबाना समाजाने दिलेल्या सहकार्यावर प्रकाश टाकण्यात येत आहे. तसेच औरंगजेबाच्या राजवटीत अत्यंत धोकादायक परस्थितीतही श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांचे अंत्यसंस्कार पार पाडणाऱ्यांनी दाखविलेल्या अपूर्व धैर्याचा गौरव करण्यात येत आहे. यासोबतच, श्री गुरू तेग बहादूर साहिब जी यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत खंबीरपणे सोबत राहिलेल्या मोहयाल समाजातील भाई मती दास जी, भाई सती दास जी व भाई दयाला जी यांच्या सर्वोच्च शहिदीलाही मानवंदना देण्यात येत आहे. श्री गुरू नानक देव जी यांच्या परंपरेनुसार सिंधी समाज हा या उपक्रमाचा अविभाज्य भाग आहे. ''गुरू नानक नाम लेवा संगत'' या संकल्पनेखाली या शिकवणींवर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांना एका समान व्यासपीठावर आणण्यात येत आहे. या कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा केंद्रबिंदू म्हणजे सेवा भावनेतून आयोजित करण्यात येणारा भव्य लंगर, जो गुरुजींच्या समानता, करुणा व निःस्वार्थ सेवेच्या मूल्यांचे प्रतीक आहे. केंद्र सरकारतर्फेदेखील विविध कार्यक्रम हाती घेण्यात आले असून श्री गुरू तेग बहादूरजींशी संबंधित कर्तारपूर कॉरिडॉरचे काम पूर्ण करणे असो, हेमकुंड साहिब येथे रोपवे प्रकल्पाचे बांधकाम असो. किंवा आनंदपूर साहिब येथील विरासत-ए-खालसा संग्रहालयाचा विस्तार असो अशा गुरूंच्या प्रत्येक पवित्र स्थळाला आधुनिक भारताच्या दृष्टिकोनाशी जोडण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

## जागतिक महिला दिन सप्ताह निमित्त

# मातीतून आयएएस शिखरावर भाग्यश्री बानायत यांची यशोगाथा

## एक आकस्मिक भेट : एक अविस्मरणीय सुरुवात

आयएएस अधिकारी श्रीमती श्रीमती बाणायत यांची माझी पहिली भेट आजपासून 24 वर्षांपूर्वी म्हणजे 10 ऑगस्ट 2002 रोजी झाली .अमरावती मधील विद्यापीठ रोडवरील महापौरांच्या बंगल्यासमोरच्या जिजाऊ नगर मधील माझ्या निवासस्थानी ही भेट झाली .त्यावेळी भाग्यश्री एक सामान्य पण डोळ्यात काहीतरी मोठे करण्याचे स्वप्न घेऊन वावरणारी विद्यार्थिनी होती.पार्श्वभूमी अशी की विदर्भातील मुलांनी प्रशासनात जावेत म्हणून आम्ही एक 12 मे २००० रोजी अमरावतीला डॉ पंजाबराव देशमुख आयएएस अकॅडमीची स्थापना केली. या उद्घाटनाला महाराष्ट्राचे सध्याचे अपर मुख्य सचिव श्री विकास खारगे हे आले होते .तसेच प्रमुख वक्ते म्हणून सध्या पुण्याला आयकर आयुक्त असलेले श्री अभिनय कुंभार हे उपस्थित होते. पुढे 2002 मध्ये मुलांसाठी अभ्यासिका व ग्रंथालय सुरू केले .त्याचे उद्घाटन सध्याचे संभाजीनगरचे जिल्हाधिकारी श्री दिलीप स्वामी यांच्या हस्ते तर माजी जिल्हाधिकारी श्री सदानंद कोचे यांच्या उपस्थितीत पार पाडले.

उद्घाटनाच्या पहिल्याच दिवशी पहिलीच विद्यार्थिनी म्हणून दाखल झाली ती भाग्यश्री बानायत. ती म्हणाली मी मोर्शी तालुक्यातील हिवरखेड येथे राहते. सध्या कॉलेजला शिकते .माझी आई खूप आजारी असते. मी अमरावतीला तुमच्या बाजूलाच असलेल्या अप्रतिम कॉलनीमध्ये राहते .तेव्हाच मला जाणवले ही मुलगी आगळीवेगळी आहे .हिला चांगले भावितव्य आहे .



### वडिलांची दूरदृष्टी स्वप्नांची रुजवात

तिचे वडील शिक्षक होते. पुढे मुख्याध्यापक झाले .पण आईचे आजारपण हे घरात सतत सुरू होतं .वडिलांनी एक अफाट कामगिरी केली .त्यांनी भाग्यश्रीला फक्त शिक्षण दिले नाही .तर तिच्या मनात स्पर्धा परीक्षेची बीजे पेरली .शाळेत असल्यापासून तिला वेगवेगळ्या उपक्रमात सहभाग होण्यासाठी प्रवृत्त केले .तिच्यातील आत्मविश्वासाची पायाभरणी करून वडिलांनी हळूहळू तिचा आत्मविश्वास वाढविला .

एके दिवशी वडिलांना एक माजी विद्यार्थी जो तोपर्यंत पोलीस ठाणेदार झाला होता . वडिलांना भेटायला आलाहोता. त्याने वडिलांना जोरदार शल्यूट करीत अभिवादन केले आणि म्हणाला सर मी तुमच्यामुळेच घडलो. हा प्रसंग भाग्यश्रीच्या मनात कोरला गेला . ही कृतज्ञता हे यश तिच्या स्वप्नांचा ठिपका बनवून तिच्या डोळ्यासमोर नाचू लागलं .या एका प्रसंगाने तिच्या आयुष्याची दिशा ठरविली.

### एकटीची झुंज: सर्वत्र अडथळे

अमरावती जिल्ह्यातील मोर्शी सारख्या छोट्याशा तालुक्यात राहून स्पर्धा परीक्षेची तयारी करणे म्हणजे नदीच्या प्रवाहात विरुद्ध दिशेने वाटचाल करण्यासारखं होतं. पुस्तकं नव्हती. मार्गदर्शन नव्हतं. वातावरण प्रतिकूल होतं. पण भाग्यश्रीने एक ठरविलं होतं.

श्रृंखला पायीच असू दे, मी गतीचे गीत गाईन
दुःख झेलण्यास, आता आसवांना वेळ नाही

या भावनेने ती झुंज देत राहिली. आईची सेवा करीत राहिली. अभ्यास करीत राहिली. नियतीने मात्र एका बाजूने तिला कठीण परीक्षांना समोर जाण्यास भाग पाडलं. वडिलांचं अचानक निधन झालं. आईचा आजारपण अधिक गंभीर झालं आणि नातेवाईकांनी

घेतला काढून खांदा ओळखीच्या माणसांनी या ओळी सत्य ठरविल्या. मदतीच्या जागी वाटणीचे हिशोब मांडण्यास सुरुवात केली. तिने हार मानली नाही. भाग्यश्री ठाम होती .ती तिच्या परीने झुंज देत राहिली .आईची सेवा करीत राहिली अभ्यास करीत राहिली. पण नियतीने मात्र तिला एकामागून एक कठीण परीक्षांना समोर जाण्यास भाग पाडलं .

भाग्यश्रीला पहिली नोकरी मिळाली ती अमरावतीला. विषय तज्ञ म्हणून. अमरावती ते मोर्शी 55 किलोमीटर अंतर. रोज 110 किलोमीटर जाणे येणे . स्पर्धा परीक्षेचा अभ्यास हे तिने एक व्रत म्हणून स्वीकारले. या व्रताची फळ येऊ लागली. महाराष्ट्र राजपत्रीत अधिकाऱ्यांची परीक्षा तिने दिली. आणि पहा कोणतेही मार्गदर्शन नाही अशा प्रतिकूल परिस्थितीत नोकरी करीत असताना तिने संपूर्ण महाराष्ट्रात ओबीसी प्रभागातून पहिला क्रमांक पटकावला .

जितनेवाले कोई अलग काम नही करते
वह हर काम अलग ढंग से करते है

हे तिने सिद्ध केले. स्वप्न पुन्हा जागे झाली. राजपत्रित अधिकारी झाल्यानंतर तिच्या सभोवतालचे वातावरण बदललं .ती नागपूरला विक्रीकर सहायक आयुक्त म्हणून रुजू झाली. तिथे तिच्या सहकाऱ्यांनी तिला विचारलं. भाग्यश्री मॅडम तुम्ही एमपीएससीमध्ये महाराष्ट्रात पहिले येऊ शकता तर यूपीएससीची तयारी का करीत नाही ? महत्त्वाकांशी असलेल्या भाग्यश्रीला ते पटलं. आणि तिने सेवेत असतानाच आयएएएसची तयारी सुरू केली. या वेळा तिच्या मदतीला धावून आले ते तिचे सहकारी आणि मार्गदर्शक श्री संजय धिवरे .त्यांनी तिच्यासाठी पुस्तक नोट्स जमविल्या. मुलाखतीची तयार करून दिली. तिचा कायापालट झाला. नोकरीमुळे पुणे मुंबई दिल्लीला जाणे शक्य नव्हतं .आईचे आजारपण एकटेपण सगळं होतं .पण तिला थांबायचं नव्हतं. तिने पहिली परीक्षा व दुसरी परीक्षा पास केली. मुलाखतीच्या सरावासाठी दिल्लीला जाणं आवश्यक होतं. पण ते शक्य नव्हतं .तरी संजय धिवरे यांनी नागपूरला तिची मुलाखतीची तयारी करून घेतली.यश आता अगदी जवळ होतं.आता तिला विश्वास होता .

### निकष मोडणारी मुलाखत

दिल्लीत यूपीएससीच्या मुलाखतीसाठी ती गेली. समोरचे पॅनल कडक होतं .कमी मार्क देण्यासाठी प्रसिद्ध होतं. पण भाग्यश्री निर्णयक होती. तिने प्रामाणिकपणे न घाबरता मुलाखत दिली. प्रश्नांची उत्तरे दिली आणि एक पाऊल पुढे जाऊन येणे इंटरव्यू घेणाऱ्या पॅनल सदस्यांना प्रतिप्रश्नही केले. ते अतिशय अपारंपरिक होतं .धाडसाचे होते. एका सदस्याने विचारले .सनदी झअधिकारी झाल्यानंतर तुम्ही कोणता प्रश्न हाताळणार. भाग्यश्री म्हणाली .सर्वप्रथम मी शेतकऱ्यांचा प्रश्न मी सोडविण्याचा प्रयत्न करणार. मुलाखत घेणारी एक सदस्य म्हणाली. अनेक प्रश्न आहेत. शेतकरीच का ? भाग्यश्रीचे उत्तर होतं . शेतकरी आज जगाचा अन्नदाता आहे .आमच्या विदर्भात शेतकरी आत्महत्याचं प्रमाण खूप जास्त आहे .या शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविणे हे माझं पहिलं कर्तव्य असेल. मुलाखतीनंतर बाहेर पडताना तिला यशाची फारशी अपेक्षा नव्हती .तिने प्रतिप्रश्न करून नियम मोडले होते .पण तिची भूमिका सत्याची व न्यायाची होती .यूपीएससीचा निकाल लागला आणि आमची भाग्यश्री बाणायत आय.ए.एस. अधिकारी झाली होती

### एक ज्योत लाखो प्रेरणा

आज भाग्यश्री हिच्या व्याख्यानांमुळे तिच्या यशोगाथे मुळे ती सर्वत्र चर्चेत आहे. तिची कहानी प्रत्येक मुलासाठी मुलीसाठी आशेची किरण आहे. आजच्या काळात स्पर्धा परीक्षेचे वातावरण सगळीकडे पसरलंय. पण संसाधन मिळणे जेव्हा कठीण होते .अशा काळात तिने तेव्हा तयारी केली. अशक्य गोष्ट शक्य करून दाखविली .आजही ती एवढी मोठी अधिकारी असूनही तिला आपण भेटला तर वाटेल की आपण एका मैत्रिणीला मोठ्या बहिणीला भेटतो आहोत.अलीकडे अमरावतीच्या सृष्टी देशमुख हिचा यूपीएससीमध्ये संपूर्ण देशात पहिला क्रमांक पटकाविला. तिचा सत्कार आम्ही केला. भाग्यश्री मॅडमला निमंत्रित केलं .तिचे बाळ लहान होतं .पण तिने नकार दिला नाही. ती आली. तिने मार्गदर्शन केले. तिच्या बोलणे ऐकायला सभागृहात जागा नव्हती .मी जेव्हा तिला कार्यक्रमासाठी फोन करतो . कार्यक्रम मोठा असो का छोटा ती येतेच .नव्या पिढीला मार्गदर्शन करते. दिशा दाखविते.

शिर्डी संस्थानच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नाशिक महापालिका अपर आयुक्त असो की रेशीम संचालनालयाच्या संचालक असो तिने प्रत्येक ठिकाणी आपल्या कार्यशैलीचा ठसा उमटविला आहे. आज जागतिक महिला दिनाचा सप्ताह सुरू आहे .अशा या प्रेरणादायी महिलेला या भाग्यश्रीला माझा मानाचा मुजरा. विपरीत परिस्थितीशी झुंज देऊन तिने यश संपादन केलेले आहे. ते नक्कीच नवीन पिढीला प्रेरणा देणारे आहे.

- **प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे**
**संचालक, मिशन आयएएस अमरावती**
**प्रारूप. प्रा. अविनाश शिरसाठ**
**अहिल्यानगर**



# विश्वास नांगरे पाटील–अप्पर महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्या हस्ते संतोष बाळु कदम यांचा सन्मान

**मुंबई, (केतन भोज)**

"माझी स्वप्नपूर्ती" पोलिस अधिकारी संभाजीराव जगन्नाथ पाटणकर लिखित पुस्तक प्रकाशन प्रसंगी विश्वास नांगरे पाटील - अप्पर महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्या हस्ते संतोष बाळु कदम यांचा सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित मान्यवर अमोल शिंदे(उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे खाजगी सचिव)तसेच इसाक बागवान माजी सहाय्यक पोलीस आयुक्त एन्काऊंटर स्पेशालिस्ट,स्वामी ओंकारानंद महाराज,शिवाजीराव जगन्नाथ पाटणकर बृहन्मुंबई पोलीस सोसायटी मा.खजिनदार,प्रतिक शिवाजीराव पाटणकर व शासकीय अध्यात्मिक मान्यवर या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाला उपस्थित होते.

# नारायण महाराज यांची १९पुण्यतिथी निमित्त कुष्णा महाराज फुंदे यांचे कीर्तन संपन्न

**कडा- प्रतिनिधी**

ह. भ. प. नारायण महाराज पगारे यांच्या १९ व्या पुण्यतिथी निमित्त कृष्णा महाराज फुंदे यांच्या कल्याच्या कीर्तनणे सांगता झाली

नारायण महाराज यांनी कापशी डोईठण येथील जोतिबा व यमई देवीच्या सेवेत त्यांचे जीवन घालवले त्यांच्या या कार्यामुळे गेली १९वर्ष पासून त्यांचे मुले, व नातवंडे नवनाथ ग्रंथ पारायण लावून हा सोहळा साजरा करत आहेत या वेळी फुंदे महाराजांनी कीर्तनतून सर्व श्रोत्यांना मंत्र मुग्ध केले. व पाप व पुण्य कसे असते हे आपल्या कीर्तनतुन सांगितले आहे.



# लेकीची छेड काढणाऱ्याला वडिलांनी दिला चोप

पुणे: पुण्यातील नामांकित एमआयटी एडीटी (MIT ADT) कॉलेज परिसरात एक संतापजनक घटना घडली. इथं एका विद्यार्थिनीच्या वडिलांनी एका विद्यार्थ्याला चोप दिला आहे. संबंधित विद्यार्थी मागील १५ दिवसांपासून पीडित तरुणीचा ऑनलाईन छळ करत होता. मुलीसोबत घडणारा प्रकार समजल्यानंतर वडिलांनी कॅम्पसमध्येच गाठून तरुणाला चांगलाच चोप दिला. या प्रकारामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून या घटनेचा व्हिडीओ समाज माध्यमात व्हायरल झाला आहे.

नेमकं काय घडलं?

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी एमआयटी कॉलेजमध्ये शिक्षण घेते. पुण्यातीलच डी. वाय. पाटील (DY Patil) कॉलेजचा एक विद्यार्थी गेल्या १५ दिवसांपासून या तरुणीला ऑनलाईन माध्यमातून सातत्याने त्रास देत होता. तिचा पाठलाग करत होता. वारंवार होणाऱ्या या मानसिक छळामुळे तरुणी अत्यंत त्रस्त झाली होती. अखेर तिने ही गोष्ट धीराने आपल्या वडिलांना सांगितली.

मुलीसोबत घडणारा प्रकार ऐकून वडिलांना संताप अनावर झाला. त्यांनी आरोपी मुलाला धडा शिकवायचं ठरवलं. ते आपल्या मुलीसोबत कॉलेजला आले. यावेळी संबंधित हुल्लडबाज विद्यार्थी पुन्हा या कॉलेज परिसरात आला. मुलीची छेड काढताना वडिलांनी त्याला रंगेहाथ पकडलं. सुरुवातीला वडिलांनी त्याला समजावण्याचा आणि जाब विचारण्याचा प्रयत्न केला, पण त्या विद्यार्थ्याने उद्दामपणा केल्याने वडिलांचा संयम सुटला. संतापलेल्या वडिलांनी त्या हुल्लडबाजाला कॅम्पसमध्येच लोळवले आणि चांगलाच चोप दिला.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)



# परळी संचारच्या वतीने महिला दिनी होणार परळीतील कर्तृत्ववान महिलांचा गौरव-अनंत कुलकर्णी

**परळी वैजनाथ, (प्रतिनिधी)**

जागतिक महिला दिनानिमित्त परळी शहरात विविध क्षेत्रात कार्य करणार्या कर्तृत्ववान महिलांचा सा.परळी संचारच्या वतीने गौरव करण्यात येणार आहे. परळी संचारचे संपादक अनंत शामराव कुलकर्णी यांनी प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात ही माहिती दिली आहे.

परळीच्या सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता, वैद्यकिय अशा विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणार्या अकरा कर्तृत्ववान महिलांचा सा.परळी संचारच्या वतीने महिला दिनी येत्या रविवारी ८ मार्चला गौरव करण्यात येणार आहे. त्यात नगराध्यक्षा सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, डॉ.शालीनी बालासाहेब कराड, सौ.शर्मिला अशोक जैन, सौ.वर्षाराणी लक्ष्मणराव हाके, नगरसेविका सौ.अर्चना महेंद्र रोडे, सौ.सुमन लक्ष्मण वाकडे, श्रीमती दुर्गा वैजनाथ दहातोंडे सौ.गौरी सुनील जोशी, कु.राधिका रामप्रसाद शर्मा, स्नेहा एकनाथ बनसोडे, जनाई महाराज कोकाटे आदी महिलांचा यानिमित्ताने गौरव करण्यात येणार आहे. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरवपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. शहरातील नाथ चित्र मंदिर परिसरातील भागवत पॅलेसच्या सभागृहात सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून अंबाजोगाई येथील सामाजिक व रोटरी क्लबच्या अध्यक्षा सौ.रोहिणी पाठक, सौ.स्वाती विलासराव ताटे, सौ.उत्पलवर्णा अमोल कांबळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा गौरव केला जाणार आहे अशी माहिती सा.परळी संचारचे संपादक अनंत कुलकर्णी यांनी दिली. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे श्री कुलकर्णी यांच्यासह सौ.शितल अनंत कुलकर्णी व परळी संचार परिवाराच्या वतीने आवाहन त्यांनी केले आहे.

## पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांवर लवकरच पदभरती – मंत्री पंकजा मुंडे

मुंबई : पशुसंवर्धन विभागातील नवीन आकृतीबंध ऑक्टोबर 2024 मध्ये मंजूर झाल्यामुळे काही संवर्गांतील पदसंख्या वाढली आहे. पदभरतीची प्रक्रिया गतीने सुरू असून पुढील अधिवेशनापर्यंत मोठ्या प्रमाणात भरतीचा प्रश्न मार्गी लागेल, असा विश्वास पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज विधानपरिषदेत व्यक्त केला.

विधानपरिषद सदस्य संजय खोडके यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना मंत्री मुंडे म्हणाल्या की, वाढीव पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) सोबत सातत्याने पत्रव्यवहार करण्यात आला आहे. त्यानुसार 25 एप्रिल 2025 रोजी एलडीओ (पशुवैद्यकीय विकास अधिकारी) पदांची जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. तसेच 12 ऑगस्ट रोजी वर्ग-एक दर्जाच्या सहा सहाय्यक आयुक्तपदांची जाहिरातही काढण्यात आली आहे.

परीक्षेसाठी पेपर सेटिंग प्रक्रियेसाठी तज्ज्ञ अधिकारी व प्राध्यापकांची नियुक्ती आवश्यक असून पेपर सेटिंगचे काम पूर्ण होताच परीक्षा घेण्यात येईल, असेही मंत्री मुंडे यांनी सांगितले. त्याचबरोबर, एमपीएससीकडूनही भरती प्रक्रियेला गती देण्याचे आश्वासन देण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.


पशुपर्यवेक्षकांची पदे जिल्हा परिषदेमार्फत भरण्यात येणार असून त्याबाबत सामान्य प्रशासन विभागाशी चर्चा झाली आहे. नवीन आकृतीबंधानुसार वाढलेल्या पदांची भरती अपरिहार्य आहे. त्यानुसार सर्व प्रक्रिया सुरू असून पुढील अधिवेशनापर्यंत मोठ्या प्रमाणात पदभरती पूर्ण होईल, असे मंत्री मुंडे यांनी सांगितले.

## निबंधक कार्यालयात सरकारी कागदपत्र फाडली ; आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**आष्टी प्रतिनिधीः**

आष्टी येथील निबंध कार्यालयात शासकीय कागदपत्रे फाडून नुकसान केल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे कार्यालयीन कामकाजात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

फिर्यादी घनश्याम कृष्णा खेडसकर (वय 54), सहाय्यक दुय्यम निबंधक, निबंध कार्यालय आष्टी, यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ते मागील तीन वर्षांपासून दुय्यम निबंधक म्हणून कार्यरत आहेत. दिनांक 27 फेब्रुवारी 2026 रोजी



सकाळी 12.20 वाजता दस्त क्रमांक 763/2026 ची नोंदणी प्रक्रिया सुरू असताना लिहून देणारे पंकज सतीश बोरा, रा. ए-4 पिनाक गार्डन, कोथरूड, जिल्हा पुणे व त्यांच्यासोबत एक अज्ञात इसम कार्यालयात आले.

यावेळी किरकोळ कारणावरून कार्यालयात अचानक वाद निर्माण झाला. त्यानंतर सोबत आलेला अज्ञात इसम तेथून निघून गेला. दरम्यान, संतापाच्या भरात पंकज सतीश बोरा यांनी टेबलावर स्कॅनिंगसाठी ठेवलेले दस्त क्रमांक 749/2026 चे शासकीय नोंदणीकृत कागदपत्र फाडून टाकले व ते कागदपत्र घेऊन कार्यालयातून निघून गेले, अशी तक्रार फिर्यादीने दिली आहे.

सरकारी दस्तऐवजांची तोडफोड व नुकसान केल्याप्रकरणी आरोपी पंकज सतीश बोरा व त्याच्या सोबत असलेल्या अज्ञात इसमाविरुद्ध अदखलपात्र गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार तागड हे करीत आहेत.




## पवित्र रमजान महिन्यात इंस्टाग्रामवर आक्षेपार्ह मजकूर टाकल्याने गुन्हा दाखल

**कडा | प्रतिनिधी**

मुस्लिम धर्मियांच्या पवित्र रमजान महिन्यांमध्ये एका तरुणाने मुस्लिम धर्मियांच्या भावना दुखावतील असा मजकूर इंस्टाग्रामवर टाकल्याने सदरील तरुणावर अंभोरा, आष्टी पोलीस ठाण्यात तसेच कडा पोलीस चौकीत तक्रार दाखल करण्यात आली असून आपल्या विरोधात तक्रार दाखल केल्याची माहिती कळताच सदरील आरोपी हा फरार झाला आहे. सदरील आरोपीचा शोध घेऊन तात्काळ अटक करावी अशी मागणी समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने निवेदनाद्वारे पोलिसांना करण्यात आली आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की, आष्टी तालुक्यातील धामणगाव येथील डॉ अकील बशीर सय्यद हे दिनांक 2 मार्च 2026 रोजी रात्री 9 वाजण्याच्या सुमारास आपल्या हॉस्पिटलमध्ये बसून इंस्टाग्राम अकाउंट पाहत असताना ZR.TV.NEWS.09 या अकाउंटवर इराण व यु ए इ या देशाच्या युद्धजन्य परिस्थितीवरील पोस्टवर धामणगाव येथील मयूर सोपान मरकड याने _mayu_markad _ या इंस्टाग्राम अकाउंट आय डी वरून मुस्लिम समाजाच्या भावना दुखावतील असा 'अल्लाह' विषयी आक्षेपार्ह मजकूर जाणीवपूर्वक टाकून पोस्ट केली होती, या प्रकरणी डॉ अकिल सय्यद यांच्या फिर्यादीवरून मंगळवार दि. 3 मार्च रोजी अंभोरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. तसेच कडा येथे सोमवार दि. 2 मार्च रोजी रमजान नूरमोहम्मद तांबोळी यांनी ही कडा पोलीस चौकीला सदरील तरुणा विरोधात फिर्याद दिलेली दिलेली आहे. आष्टी पोलीस ठाण्यात रात्री उशिरा सदरील आरोपीला अटक करण्यात यावे यासाठी मोठ्या प्रमाणावर तरुण एकत्र येऊन निवेदन देण्यात आले आहे. आपल्या विरोधात तक्रार दाखल झाल्याची माहिती आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या तरुणाला माहिती होताच सदरील तरून हा फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. पुढील तपास अंभोरा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक आदिनाथ भडके हे करत आहेत.

## पोलीस पाटील मुलाखती दरम्यान उमेदवारांची आर्थिक लूट

### पाटोदा येथील झेरॉक्स चालकांकडून अवाजवी दर आकारणी – दरपत्रक लावण्याची मागणी

**आष्टी (प्रतिनिधी) :**

बीड जिल्ह्यातील पोलीस पाटील भरती प्रक्रियेअंतर्गत मुलाखतीसाठी मोठ्या संख्येने उमेदवार पाटोदा येथे दाखल झाले असताना, उपजिल्हाधिकारी कार्यालय परिसरात काही झेरॉक्स चालकांकडून उमेदवारांची आर्थिक लूट होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

पाटोदा येथील उपजिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालय व पंचायत समिती यांच्या समोरील झेरॉक्स केंद्रांवर एका झेरॉक्स प्रतीसाठी प्रत्यक्षात एक रुपया खर्च येत असताना पाच रुपये आकारले जात असल्याची तक्रार उमेदवारांनी केली आहे. मुलाखतीसाठी आवश्यक कागदपत्रांच्या प्रती काढताना उमेदवारांकडून पाचपट दर आकारला जात असून, ही सरळसरळ आर्थिक लूट असल्याचे संतप्त उमेदवारांनी सांगितले.

पोलीस पाटील मुलाखतीसाठी ग्रामीण भागातील, खेड्या-पाड्यातील अनेक तरुण मोठ्या अपेक्षेने व आर्थिक अडचणींवर मात करत पाटोदा येथे आले आहेत. काही जण शेतकरी कुटुंबातील असून प्रवास खर्च, जेवणखर्च आणि कागदपत्रांची पूर्तता यासाठी आधीच मोठा खर्च सहन करत आहेत. अशा



परिस्थितीत झेरॉक्ससारख्या मूलभूत सेवेवर अवाजवी दर आकारले जात असल्याने उमेदवारांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

विशेष म्हणजे, ही दरवाढ सर्व शासकीय कार्यालयांच्या समोरच उघडपणे होत असल्याने संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याची भावना उमेदवारांनी व्यक्त केली आहे. "मुलाखतीसाठी तातडीने कागदपत्रे लागतात, त्यामुळे नाईलाजाने जास्त पैसे द्यावे लागतात," अशी खंत काही उमेदवारांनी व्यक्त केली.

या प्रकारामुळे फक्त उमेदवारच नव्हे तर शेतकरी व सामान्य नागरिक देखील त्रस्त आहेत. दररोज विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांकडूनही याच पद्धतीने जादा दर आकारले जात असल्याची चर्चा परिसरात आहे.

उमेदवार व नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ हस्तक्षेप करून संबंधित झेरॉक्स केंद्रांची तपासणी करावी, अधिकृत दरपत्रक लावण्याचे आदेश द्यावेत आणि अवाजवी दर आकारणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी केली आहे.

सरकारी भरती प्रक्रियेसारख्या संवेदनशील व पारदर्शक उपक्रमादरम्यान उमेदवारांची आर्थिक पिळवणूक होणे हे प्रशासनासाठी चिंताजनक बाब असल्याचे मत जाणकारांनी व्यक्त केले आहे. आता जिल्हा प्रशासन या प्रकरणाची कितपत दखल घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## आठ वर्षीय फैजान पठाणने पूर्ण केला आयुष्यातील पहिला रोजा

**आष्टी | प्रतिनिधी**

सध्या मुस्लिम बांधवांचा अत्यंत पवित्र मानला जाणारा रमजान महिना मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावात साजरा होत आहे. कडक उन्हाळा आणि दिवसाचे मोठे तास असतानाही अबालवृद्धांमध्ये रोजा ठेवण्याचा मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. याच पवित्र महिन्याचे औचित्य साधत, फैजान आबेद पठाण या केवळ ८ वर्षीय चिमुकल्याने आपला आयुष्यातील पहिला रोजा यशस्वीरित्या पूर्ण केला आहे.

रमजान महिन्यातील उपवास (रोजा) हा अत्यंत कठीण मानला जातो. पहाटेपासून ते सूर्यास्तापर्यंत पाणीही न पिता राहणे हे लहानांसाठी आव्हानात्मक असते. मात्र, फैजानने आपल्या प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर हा रोजा पूर्ण केला. दिवसभर खेळण्यासोबतच त्याने नमाज आणि ईबादतमध्येही लक्ष दिले. फैजानने वयाच्या अवघ्या ८ व्या वर्षी दाखवलेल्या या धार्मिक निष्ठेबद्दल त्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. रोजा सोडताना (इफ्तारच्या वेळी) त्याच्या कुटुंबीयांनी त्याचे अभिनंदन केले.

"लहान वयातच मुलांमध्ये संयम आणि धार्मिक संस्कार रुजावेत, यासाठी फैजानने स्वतःहून रोजा ठेवण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्याने तो पूर्ण केल्याचा आम्हाला अभिमान आहे," अशी भावना त्याच्या कुटुंबीयांनी व्यक्त केली. फैजानच्या या यशाबद्दल त्याचे नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिकांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

## कासेवाडी येथे जिल्हा नेतृत्वगुण विकास उद्बोधन शिबिराचे आयोजन

**कडा । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मार्गदर्शनाखाली आणि आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ॲड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय, आष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे कासेवाडी, ता. आष्टी, जि. बीड येथे जिल्हा नेतृत्वगुण विकास उद्बोधन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर दि. ०५ ते ०९ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले असून जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक या शिबिरात सहभागी होणार आहेत. शिबिरामध्ये नेतृत्व विकास, सामाजिक बांधिलकी, ग्रामविकास, संविधान मूल्ये, मानसिक आरोग्य, उद्योजकता, आपत्ती व्यवस्थापन अशा विविध विषयांवर तज्ञ मान्यवरांचे मार्गदर्शन होणार आहे.

शिबिराच्या उद्घाटन समारंभास आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. किशोर (नाना) हंबर्डे अध्यक्षस्थानी उपस्थित राहणार असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना संचालक मा. सोमिनाथ खाडे उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

शिबिरामध्ये व्याख्यानमाला, ग्रामसंवाद, श्रमदान, ग्रामस्वच्छता, ग्राम सर्वेक्षण, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दि. ०५ मार्च रोजी सायंकाळी पद्मश्री चैत्रामजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी संवाद कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे.

शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक जाणीव व राष्ट्रसेवेची भावना विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सोपानराव निंबोरे यांनी यांनी दिली. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी उपप्राचार्य बाबासाहेब मुटकुळे, उपप्राचार्य अविनाश कंदले, पर्यवेक्षक अशोक भोगाडे,जिल्हा समन्वयक रवी सातभाई, कार्यक्रम अधिकारी सुहास गोपणे, नॅक समन्वयक निवृत्ती नानवटे, भगवान वाघमारे, सखाराम वाढरे, रमेश भारूडकर, संतोष वनगुजरे व सर्व महाविद्यालयीन कर्मचारी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक मेहनत घेत आहेत.

# लोकायुक्तांच्या निकालावर धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले समाधान

## मला राजकारणच नाही तर आयुष्यातून उठवण्याचे हे षडयंत्र : धनंजय मुंडे



### खोटे पुरावे उभे करुन बदनामी करुन कुणाचेही आयुष्य उध्वस्त करु नका - धनंजय मुंडे यांनी केले आवाहन

■ मुंबई (प्रतिनिधी) -

राज्याच्या कृषीमंत्री पदी असताना केलेल्या कृषी साहित्य खरेदी संदर्भात मा. उच्च न्यायालयापाठोपाठ राज्य लोकायुक्त यांनी देखील आपल्याविरुद्ध केलेले सर्व आरोप फेटाळून लावले असून आपण शासनाच्या नियमानुसार व शेतकऱ्यांचे हित समोर ठेऊनच संबंधित खरेदी बाबतचा निर्णय शासनाच्या विशेष कृती आराखड्याच्या अंतर्गत घेतला होता. या प्रकरणात न्यायव्यवस्था आणि नियतीने सत्य समोर आणले आहे, असे म्हणत धनंजय मुंडे यांनी लोकायुक्तांच्या निर्णयावर समाधान व्यक्त केले आहे. आज मुंबईतील विधानभवन येथे धनंजय मुंडे यांनी बऱ्याच दिवसानंतर पत्रकारांशी सविस्तर चर्चा केली.

कृषी साहित्य खरेदी, ऑफिस ऑफ प्रॉफिट असे नाना प्रकारचे आरोप माझ्यावर करण्यात आले, यामध्ये कृषी खरेदीबाबत सुरुवातीला मात. उच्च न्यायालयात ज्यांनी तक्रार केली होती, त्यांना खोटे पुरावे दिले आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून शासनाची बदनामी केली म्हणून उच्च न्यायालयाने एक लाखांचा दंड ठोठावला, त्यांनी तो भरला सुद्धा.ऑफिस ऑफ प्रॉफिट, पिक विमा असा कोणताही आरोप सिद्ध झाला नाही, मात्र माझ्या बदनामीच्या ट्रायल रंगवून दाखवल्या केल्या.

हे एक मोठे षडयंत्र असून, मला केवळ राजकारण किंवा समाजकारण यामधून संपवायचे नाही तर काही लोकांना मी या पृथ्वीतलावर नको आहे, त्यातून हे सगळे घडवून आणले जात असल्याचा गंभीर आरोप धनंजय मुंडे यांनी यावेळी बोलताना केला.

अंजली दमानिया यांच्या बाबत विचारले असता धनंजय मुंडे म्हणाले की त्यांनी संपूर्ण जीवनात नितीन गडकरी साहेब, स्व. अजितदादा, खडसे साहेब, भुजबळ साहेब, तटकरे साहेब अशा अनेक नेत्यांवर ढीगभर आरोप करून बदनामी केली, मात्र त्यांनी केलेला एकतरी आरोप कुठे सिद्ध झाले का?

केवळ खोटे पुरावे समोर आणायचे, माध्यमांच्या समोर सनसनी निर्माण करायची आणि एखाद्याला बदनाम करायचे, हे सगळे थांबवले गेले पाहिजे. असे कळकळीचे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले. तर पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आपण सध्यातरी अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार नसल्याचे मुंडेंनी स्पष्ट केले.

दरम्यान मागील काही महिन्यांपासून आपल्या विरुद्ध मोठे षडयंत्र रचले जात आहे. त्यातूनच रोज नवनवीन आरोप आणि बदनामीची एक अजब मालिका सुरू आहे. मात्र न्यायव्यवस्थेसमोर एकही आरोप सिद्ध झालेला नाही. आपली बाजू सत्याची आणि त्यामुळेच नियती आपल्या सोबत आहे; त्यामुळे सहकारी आणि कार्यकर्त्यांनी देखील संयम ठेवावा, असे आवाहनही धनंजय मुंडे यांनी आपल्या कार्यकर्त्यांना केले आहे.

## जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी संयम ठेवावा, मुंडेंचे आवाहन



# नालंदा बौद्ध विहार मिलिंद नगर, येथे फाल्गुन पौर्णिमा साजरी..!

आज दि. ०३ मार्च २०२६ रोजी नालंदा बौद्ध विहार मिलिंद नगर, परळी-वै. येथे सर्वप्रथम महाकारूणीक, तथागत भगवान बुद्ध, बोधिसत्व, परमपूज्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची पुष्प, धूप, दिपाने पूजन उपस्थित बौद्ध उपासक, उपासिका, तसेच बालक, बालिका यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर आदर्शांना पंचांग प्रणाम करण्यात आला.

यावेळी आयु. आनंद तुपसमुद्रे (सर) यांनी फाल्गुन पौर्णिमेचे महत्त्व पुढीलप्रमाणे समजावून सांगितले.

भगवान बुद्धांचा एकुलता एक पुत्र राहुल वयाच्या सात वर्षाचा झाला असतांना, तथागत भगवान बुद्ध कपिलवस्तू येथे आले होते. तेव्हा राहुलची आई व भगवान बुद्धांची पत्नी महाराणी यशोधरा यांनी राहुल याला भगवान बुद्धांकडे पाठवून वारसा हक्क मागण्यास सांगितले. तेव्हा भगवान बुद्धांनी आजच्या दिवशी भंते सारिपुत्तांच्या हस्ते राहुलला कपिलवस्तू येथे श्रामनेर प्रवज्जा दीक्षा दिली. तसेच भगवान बुद्धांचा सावत्र भाऊ "नंद" याला सुद्धा आजच्याच दिवशी संघाची प्रवज्जा कपिलवस्तू येथे दिली." तसेच प्रत्येक बौद्ध उपासक, उपासिका यांनी त्रिसरण-पंचशीलासह अष्ठशील उपोसथाचे पालन कसे करावे. अष्ठशील म्हणजे काय? तर...

मी उंच आणि मौल्यवान आसनावर, तसेच उंच शय्येवर झोपण्यापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो. इत्यादी महत्वपूर्ण माहिती उपस्थितांना समजावून सांगितली. तसेच सखोल मार्गदर्शन केले. त्यानंतर आदर्शांना पंचांग प्रणाम करण्यात आला. त्यानंतर सामुदायिक त्रिसरण-पंचशील, बुद्धपुजा, भिमस्मरण-भीमस्तुती, बुद्धवंदना, धम्मवंदना, संघवंदना, संकल्प गाथा, आहार गाथा, मूर्तीप्रतिष्ठापणा गाथा, परित्राणपाठ, धम्मपालन गाथा, महामंगलसुत्त, करणीयमेत्त सुत्त, पुण्यानुमोदन गाथा, महामंगल गाथा, सब्ब सुख गाथा, धम्मध्वज वंदना, जयमंगल अष्टगाथा, प्रतिज्ञा, पत्तीदान गाथा, आशिर्वाद गाथा, २२ प्रतिज्ञा, भारतीय संविधान उद्देशिका, व शेवटी सरणत्तय गाथा घेण्यात आली. यावेळी आयु.नि. शकुंतलाबाई जगन्नाथ काळे, आयु. शोभाताई विजयकुमार गोदाम, आयु. नि. अल्काताई गौतम काळे, आयु. नि. नंदिनीताई संजय कसबे, आयु. नि. रेखाताई रवि कसबे, आयु. आनंद तुपसमुद्रे (सर), चि. प्रसेनजीत आनंद तुपसमुद्रे, चि. गौरव आनंद तुपसमुद्रे, चि. शाहू चंदन गोदाम, कु. माही चंदन गोदाम इत्यादीं उपस्थित होते.

# आखाती युद्धाचा फटका; कांदा, द्राक्षे-बेदाणा व्यापारावर परिणाम, सुरेश धस यांची सभागृहात आक्रमक मागणी

■ आष्टी (प्रतिनिधी)

सुरेश धस यांनी महाराष्ट्र विधिमंडळ यांच्या अर्थसंकल् पीय अधिवेशन २०२६ दरम्यान आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील कृषी निर्यातीवर होत असलेल्या गंभीर परिणामांचा मुद्दा लक्षवेधी सूचनेद्वारे सभागृहात उपस्थित केला. कांदा, द्राक्षे आणि बेदाणा या प्रमुख पिकांच्या निर्यात व्यापारावर मोठा परिणाम होत असून शेतकरी व व्यापाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले.

धस यांनी सांगितले की, आखाती देश हे महाराष्ट्रातील कृषी उत्पादनांचे प्रमुख निर्यात बाजारपेठ असून सध्याच्या परिस्थितीमुळे मालाची निर्यात रखडली आहे. परिणामी बाजारभाव घसरत असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी त्यांनी केली.

सध्या अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्याने तत्काळ बैठक घेणे शक्य नसले तरी अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर संबंधित मंत्र्यांनी तातडीने बैठक बोलावून ठोस निर्णय घ्यावा, अशी विनंतीही त्यांनी सभागृहात केली. यावर संबंधित मंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेत लवकरच बैठक घेण्याचे आश्वासन दिले.



दरम्यान, चीनमार्गे अफगाणिस्तान येथून मोठ्या प्रमाणावर बोगस बेदाणा राज्यात दाखल होत असल्याचा गंभीर मुद्दाही धस यांनी उपस्थित केला. पिंपळगाव बसवंत येथील प्रमुख बाजार समिती तसेच तासगाव परिसरात अशा प्रकारचा माल आल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. या प्रकरणातील जबाबदारांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

या प्रश्नांमुळे राज्यातील कृषी व व्यापार क्षेत्रातील चिंता वाढली असून सरकारच्या पुढील निर्णयाकडे शेतकरी व व्यापाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# राज्यस्तरीय 'फ्युजन 2026' फॅशन शोमध्ये काव्या महिला महाविद्यालयाचा दिमाखदार विजय

■ आंबेजोगाई | प्रतिनिधी

दयानंद कला महाविद्यालय, आंबेजोगाई येथे आयोजित करण्यात आलेल्या 'फ्युजन २०२६' या राज्यस्तरीय फॅशन डिझाइन स्पर्धेत काव्या महिला महाविद्यालय, आंबेजोगाईच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम पारितोषिक पटकावले. संपूर्ण महाराष्ट्रातील २२ महाविद्यालयांच्या सहभागात झालेल्या या स्पर्धेत काव्या महाविद्यालयाच्या संघाने आपल्या कल्पकता, सादरीकरण आणि आत्मविश्वासाच्या जोरावर सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

२५ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडलेल्या या रंगतदार फॅशन




शोमध्ये काव्या महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी शीतल जोशी हिने 'बॉलिवूड थीम'वर आधारित सादरीकरण करत परीक्षकांची मने जिंकली. पारंपरिक आणि आधुनिकतेचा सुंदर मिलाफ साधत केलेल्या या सादरीकरणाला प्रेक्षकांकडूनही उत्स्फूर्त दाद मिळाली. या यशामागे संस्थेचे अध्यक्ष जयंत करपे सर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्राचार्य करुणा लोमटे मॅडम, प्रा. शीला होके, प्रा. अदमाने मॅडम व सर्व शिक्षक व कर्मचारीवर्ग यांनी विद्यार्थिनींचे विशेष कौतुक केले. त्यांच्या प्रोत्साहनामुळेच विद्यार्थिनींना हे यश संपादन करता आले, अशी भावना व्यक्त करण्यात आली. काव्या महिला महाविद्यालयाच्या या दिमाखदार यशामुळे आंबेजोगाई शहराच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा रोवला गेला असून सर्व स्तरांतून विजेत्या विद्यार्थिनींचे अभिनंदन होत आहे.








# परळी तालुक्याची 'कृषी स्पंदन' महोत्सवात दमदार कामगिरी

## विविध स्पर्धांमध्ये लक्षणीय सहभाग आणि विविध स्पर्धांत मिळविला विजय

■ परळी | प्रतिनिधी

बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या कृषी विभागाच्या दोन दिवसीय 'कृषी स्पंदन' महोत्सवात परळी तालुक्याने उत्स्फूर्त सहभाग नोंदवत उल्लेखनीय कामगिरी केली. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धांमध्ये सहभाग घेत अनेक स्पर्धांमध्ये विजय संपादन करून तालुक्याचे नाव उज्ज्वल केले.

जिल्हा कृषी कार्यालयाच्या वतीने आयोजित या महोत्सवात विविध क्रीडा प्रकारांसह सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. परळी तालुक्यातील कृषी अधिकारी, मंडळ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी क्रिकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी, दोरीखेच, बॅडमिंटन, कॅरम, बुद्धिबळ तसेच १००, २०० आणि ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. दैनंदिन कामाच्या व्यापातून थोडी विश्रांती मिळावी आणि परस्परांतील सुसंवाद वाढावा या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवात परळी तालुक्याने संघभावना, शिस्त आणि उत्कृष्ट क्रीडास्पर्धा कौशल्य यांचे दर्शन घडवले. सांस्कृतिक विभागातही परळी तालुक्याच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी गायन, समूह सादरीकरण व पारंपरिक वेशभूषा सादरीकरणातून प्रेक्षकांची मने जिंकली. तालुक्यातील महिला कर्मचाऱ्यांचा सहभाग विशेष लक्षवेधी ठरला.

दररोजच्या प्रशासकीय कामातून वेळ काढून परळी तालुक्याच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या सरावाचे फळ या महोत्सवात दिसून आले. तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली संघभावना व शिस्तबद्ध नियोजनामुळेच हा महोत्सवात यशस्वी सहभाग शक्य झाल्याची भावना सहभागी कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.

या यशाबद्दल तालुका कृषी अधिकारी व सर्व सहभागी अधिकारी-कर्मचाऱ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून, भविष्यातही अशीच दमदार कामगिरी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.